| | | |
|---|---|---|
| MHMM130085222021 | दाखल तारीख – | १४/०९/२०२१. |
| | नोंदलेली तारीख – | १४/०९/२०२१. |
| | निकाल तारीख – | ०४/०४/२०२६ |
| | कालावधी – | **०४ व. ०६ म. २१ दि.** |

भाग अ
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (1))

**कुर्ला, मुंबई येथील न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) न्यायालय क्र.५१, यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : शिवकांत म. गौरगोंड)

फौजदारी खटला क्र.५१०१९३९**/पीडब्ल्यु/२०२१**
निशाणी क्र.१४

**महाराष्ट्र शासनतर्फे कुर्ला पोलीस स्टेशन, मुंबई यांचे प्रथम खबर अहवाल क्रमांक ०२/२०२१**
**(गुन्हा – भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, ४५२, ३२३, ५०४ सह ३४ प्रमाणे)**

| | |
|---|---|
| फिर्यादीचे नाव | **महाराष्ट्र शासनतर्फे**<br>पोलीस निरिक्षक कुर्ला पोलीस स्टेशन, कुर्ला, मुंबई |
| प्रतिनिधीत्व | श्री. आर.आर. रोकडे, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपींची नावे | **१) याकुब इम्तीयाज अहमद शेख,** वय – ६८ वर्षे,<br>**२) अतीकुर रहमान याकुब शेख,** वय – ४० वर्षे,<br>**३) झियाउर रहमान याकुब शेख,** वय – ३८ वर्षे,<br>आ.क्र.१ ते ३ रा.– रुम नं.१५, १६, समी बिल्डींग, दुसरा माळा, किंग्ज बेकरीच्या बाजूला, पाईप रोड, कुर्ला (प), मुंबई–७०. |
| प्रतिनिधीत्व | **श्री. ए. आर. शेख, आरोपींतर्फे विधीज्ञ** |

---

| भाग ब<br>(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**II**)) | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०३/०१/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | १४/०९/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १८/०९/२०२४ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०४/०४/२०२६ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०४/०४/२०२६ |
| निकाल दिनांक | ०४/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक | निरंक |

**आरोपींचे तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याचा दिनांक | आरोपीस जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप | निर्दोष / दोषी | किती शिक्षा सुनावण्यात आली | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | याकुब इम्तीयाज अहमद शेख | ११/०२/२०२१ | १४/०९/२०२१ | भा.दं. सं. कलम ३५४, ५०९, ४५२, ३२३, ५०४ सह ३४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | अतीकुर रहमान याकुब शेख | ११/०२/२०२१ | १४/०९/२०२१ | वरील प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | झियाउर रहमान याकुब शेख | ११/०२/२०२१ | १४/०९/२०२१ | वरील प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

---

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक ०४ एप्रिल २०२६)

१. सदर दोषारोपपत्र हे आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, ४५२, ३२३, ५०४ सह ३४ खालील आरोपासंदर्भात दाखल केले आहे.

**सदर प्रकरणातील अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे –**

२. दि.०३.०१.२०२१ रोजी रात्री ०९.३० च्या दरम्यान फिर्यादी (गुन्हयाचे स्वरुप विचारात घेवून फिर्यादी हि महिला असल्यामुळे तिचे नाव नमुद करण्यात येत नाही) व तिचे पती राहत्या घरी बसलेले असताना आरोपी घरामध्ये घुसून भाडयाच्या कारणावरुन व पुर्वी झालेल्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ केले. त्यावेळी आरोपी याकूब शेखने फिर्यादीला 'रंडी, छिनाल, तुमको भाडे की पावती चाहीए क्या' असे बोलून फिर्यादीचे हात पकडले. त्यामुळे फिर्यादीच्या मनाला लज्जा उत्पन्न झाले. त्यावेळी फिर्यादीच्या पतीने फिर्यादीला बाजूला केले असता आरोपी जिया शेख व अतीक शेख यांनी फिर्यादीच्या पतीला मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

३. सदर फिर्यादवरुन कुर्ला पोलीस स्टेशनला गु.र.नं.०२/२०२१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरिक्षक प्रविण राठोड यांनी केलेला आहे. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये तपासअधिकाऱ्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवलेले आहेत. सदर तपासअधिकारी यांना तपासामध्ये आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केलेले

---

आहे.

४. त्यानंतर आरोपींविरुध्द नि.क्र. ०२ प्रमाणे दोषारोप निश्चित केलेला आहे. सदर दोषारोप आरोपींना वाचून दाखवून समजावून सांगण्यात आलेला आहे. सदर आरोपींनी गुन्हा कबूल न केल्यामुळे व प्रकरण पुढे चालविण्याची विनंती केल्यामुळे प्रकरण पुढे चालविण्यात आलेले आहे.

५. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली असून सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपींच्या विरुध्द कोणताही पुरावा आलेला नसल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्यात आलेला नाही.

६. सदर प्रकरणातील दोषारोप व पुरावा विचारात घेऊन सदर प्रकरण निकाली काढण्याकरीता मी खालील मुद्दे विचारात घेतलेले आहेत. सदर मुद्यांना कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०३/०१/२०२१ रोजी २१.३० च्या दरम्यान रुम नं.१७–१८, पहिला मजला, सय्यद मंजिल, पाईप रोड, कुर्ला (प), मुंबई येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फौजदारीपात्र बलप्रयोग करुन फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे हात पकडून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले, अशा प्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३५४ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २. | वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला 'रंडी, छिनाल' अशी अश्लील शिवीगाळ केले, अशा प्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०९ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| ३. | वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या, फिर्यादी व तिचे पतीला मारहाण करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या घरामध्ये घुसून अतिक्रमण केले, अशा प्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ४५२ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| ४. | वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या पतीला मारहाण करुन जखमी केले, अशा प्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| ५. | वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीकडून सार्वजनिक शांतता भंग होईल अशाप्रकारे फिर्यादीला शिवीगाळ केली, अशा प्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| ६. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## <u>का र ण मि मां सा</u>

७. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता

श्री. आर.आर. रोकडे व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. ए. आर. शेख यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील पुराव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

**मुद्दा क्र.१ ते ५ करीता** :–

८. सदर प्रकरणातील दाखल पुराव्यावरुन सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, ४५२, ३२३, ५०४ सह ३४ खालील आरोपासाठी प्रकरण पुढे चालविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने सा.क्र.१ म्हणून फिर्यादी व सा.क्र.२ म्हणून फिर्यादीच्या पतीची साक्ष नोंदवलेली असून सदर साक्षीदारांनी सरतपासामध्ये घटनेबाबत आठवत नसल्याचे कथन केलेले आहे. सदर साक्षीदाराची अभियोग पक्षाने उलटतपासणी घेतलेली असून सदर उलटतपासामध्ये अभियोग पक्षाच्या केसला पुरक असा कोणताही पुरावा आलेला नाही.

९. सदर सा.क्र.१ व २ यांच्या साक्षीवरुन आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे व आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने फिर्यादी व आरोपींनी नि. क्र.११ ला संयुक्त पुरसिस दाखल केले आहेत. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने इतर कोणत्याही साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली नाही. तसेच फिर्यादी म्हणजे पिडीतच अभियोग पक्षाच्या खटल्यास सहकार्य करीत नसल्यामुळे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याकरीता प्रकरण प्रलंबित ठेवणे न्यायोचित होणार नाही. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने दाखल केलेल्या

पुराव्यावरुन आरोपींनी फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे हात पकडून तिच्या मनाला लज्ञा उत्पन्न होईल किंवा तिला अपमानित करण्याच्या हेतूने गुन्हेगारी बळाचा वापर केल्याचे, अश्लील शिवीगाळ केल्याचे, फिर्यादीच्या घरामध्ये फौजदारी अतिक्रमण केल्याचे, फिर्यादीच्या पतीला मारहाण केल्याचे व शिवीगाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ५ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.६ करीता** :-

१०. वर नमूद चर्चेवरुन व सदर प्रकरणात दाखल पुराव्यावरुन स्पष्ट होते की, आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले भा.दं.सं कलम ३५४, ५०९, ४५२, ३२३, ५०४ सह ३४ खालील आरोप अभियोग पक्षाने सबळ व विश्वसनिय पुराव्याने निःसंशयपणे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी हे सदर आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.**१) याकुब इम्तीयाज अहमद शेख, २) अतीकुर रहमान याकुब शेख आणि ३) झियाउर रहमान याकुब शेख** यास भारतीय दंड संहिता कलम ३५४, ५०९, ४५२, ३२३, ५०४ सह ३४ खालील आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

---

| | |
|---|---|
| ३. | आरोपीचे जामीन बंधपत्र व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ४. | फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ४३७ (अ) प्रमाणे आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु.५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचे जामीन दयावे. |
| | न्यायनिर्णय न्यायालयात घोषित करण्यात आला. |

SHIVAKANT MACHHINDRA GOURGOND

Digitally signed by SHIVAKANT MACHHINDRA GOURGOND
Date: 2026.04.06 13:22:23 +0530

(शिवकांत म. गौरगोंड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
५१ वे न्यायालय, कुर्ला मुंबई.

दिनांकः– ०४.०४.२०२६.

परीशिष्ठ

| भाग क<br>(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (III)) |
|---|

**अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**<u>अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी</u>**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | गुन्हयाचे स्वरुप विचारात घेवून फिर्यादी हि महिला असल्यामुळे तिचे नाव नमुद करण्यात येत नाही | फिर्यादी | १२ |
| २. | फिर्यादीचे पती | साक्षीदार | १३ |

**ब) बचावाचे साक्षीदार – नाही.**

**क) न्यायालयीन साक्षीदार – नाही.**

**अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन निशाणी**

---

**अ) अभियोगपक्ष निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब) बचावपक्ष निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) न्यायालयातर्फे निशाणी - निशाणी काही नाही.**

**ड) सामग्री वस्तु -निरंक**

SHIVAKANT MACHHINDRA GOURGOND

Digitally signed by SHIVAKANT MACHHINDRA GOURGOND
Date: 2026.04.06 13:22:32 +0530

(शिवकांत म. गौरगोंड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
५१ वे न्यायालय, कुर्ला मुंबई.

दिनांकः– ०४.०४.२०२६.

ssm/-

Directly Dictated on : 04.04.2026
Checked and signed on : 04.04.2026